आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
४ जुलै २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- त्रिनिदादमधल्या भारतीय वंशांच्या नागरिकांना OCI कार्ड देण्याची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची घोषणा

- थोरले बाजीराव पेशवे यांच्या पुतळ्यासाठी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी हीच योग्य जागा असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन

- केंद्रीय विद्यापीठातली पदवी अभ्यासक्रम प्रवेश परीक्षा CUET २०२५ परीक्षेचा निकाल जाहीर

**आणि**

- अँडरसन-तेंडुलकर करंडकातल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात जेमी स्मिथ आणि हॅरी ब्रूक यांनी सावरला इंग्लंडचा डाव

**<><><><><>**

त्रिनिदादमधले भारतीय वंशाचे नागरिक आता ओवरसीज सिटीजन ऑफ इंडिया कार्ड साठी पात्र ठरतील अशी घोषणा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केली. त्रिनिदाद आणि टोबॅगोतल्या भारतीय समुदायाला संबोधित करताना त्यांनी ही घोषणा केली. या कार्डामुळे भारतीय वंशाच्या नागरिकांना भारतात राहण्यास आणि काम करण्यास कोणतीही अडचण येणार नाही. त्रिनिदाद आणि टोबॅगोमधल्या भारतीय समुदायाचा प्रवास धैर्याचा असल्याचं ते म्हणाले. कॅरेबियन द्विपसमूहात सर्वप्रथम आर्थिक व्यवहारात यूपीआय प्रणालीचा वापर केल्याबद्दल मोदी यांनी त्रिनिनाद आणि टोबॅगोचं कौतुक केलं.

यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी अर्जेंटिनाच्या राष्ट्रपती जेवियर मिली यांच्या आमंत्रणावर अर्जेंटिनाला भेट देत आहेत. ५७ वर्षांनंतर भारतीय प्रधानमंत्र्यांची

अर्जेंटिनाला ही पहिलीच भेट आहे. या भेटीत दोन्ही देशांमधे सहयोग आणि भागीदारी वाढवण्याच्या उपायांवर चर्चा होईल.

**<><><><><>**

केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांनी आज विविध राज्यात झालेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर गुजरात, हिमाचल प्रदेश, राजस्थान, उत्तराखंड आणि छत्तीसगडच्या मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा केली. केंद्र सरकारकडून सर्व प्रकारचं सहाय्य करण्याची हमी त्यांनी दिली. या राज्यांमध्ये राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या तुकड्या पुरेशा प्रमाणात तैनात असून आवश्यकतेनुसार अधिक मदत पाठवू, असं शहा यांनी सांगितलं.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज पुण्यात राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या त्रिशक्ती प्रवेशद्वारावर थोरले बाजीराव पेशवे यांच्या अश्वारूढ पुतळ्याचं अनावरण केलं. थोरले बाजीराव पेशवे यांच्या स्मारकाची योग्य जागा ही राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी हीच आहे. याच ठिकाणी तिन्ही सैन्यदलांचे अधिकारी भविष्याचं प्रशिक्षण घेतात. ते बाजीराव यांच्याकडून प्रेरणा घेतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

**- होल्ड - अमित शहा बाइट -**

इतिहास बदलण्याचा प्रयत्न केला गेला परंतु इतिहासातील या योद्ध्यांची माहिती नव्या पिढी पर्यंत पोहोचवणं आवश्यक असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केलं. या कार्यक्रमानंतर शाह यांनी एनडीए च्या छात्रांशी संवाद साधला.

**<><><><><>**

महाराष्ट्रात मराठीचा अभिमान बाळगणं हे अजिबात चुकीचं नाही. पण, भाषेच्या मुद्द्यावरून कुणालाही मारहाण करणं चुकीचं आहे. अशा प्रकारच्या

कृत्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते.

**होल्ड बाईट - मुख्यमंत्री (१३ सेकंद)**

<><><><><>

शालेय अभ्यासक्रमात हिंदी सक्तीच्या शासन निर्णया विरोधात जाहीर केलेला मनसे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षांचा विजयी मेळावा उद्या सकाळी होणार आहे. मुंबईत वरळी NSCI डोम इथं या मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं आहे. या मेळाव्याला मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे उपस्थित राहणार आहेत.

<><><><><>

परभणीतले कार्यकर्ते सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कोठडीतल्या मृत्यूप्रकरणी संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांविरोधात आठ दिवसांच्या आत गुन्हा दाखल करण्याचे निर्देश न्यायालयानं दिले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठानं आज हे आदेश दिले. राज्य सरकार आणि पोलिसांनी सुर्यवंशी यांचा मृत्यू हृदयविकारानं झाल्याचा दाखवण्याचा प्रयत्न केला, मात्र न्यायालयानं हा दावा फेटाळला, तसंच सुर्यवंशी यांच्या आईंनी दाखल केलेल्या अर्जाच्या आधारेच गुन्हा दाखल करावा, असे निर्देश न्यायालयानं दिले असल्याची माहिती याप्रकरणातले वकील आणि वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी बातमीदारांशी बोलताना दिली.

<><><><><>

कॉमन युनिव्हर्सिटी एंट्रन्स टेस्ट-CUET २०२५ चा निकाल राष्ट्रीय चाचणी एजन्सीनं आज जाहीर केला. या परीक्षेत एका विद्यार्थ्यानं चार विषयांमध्ये १०० पर्सेंटाईल गुण मिळवले आहेत.

देशातली विविध केंद्रीय विद्यापीठं आणि सहभागी संस्थांमधील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेशांसाठी ही परीक्षा घेतली जाते. १३ मे आणि ४ जून अशा दोन टप्प्यांमध्ये झालेल्या परीक्षेसाठी १३ लाख ५४ विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. विद्यार्थ्यांना त्यांचा निकाल cuet.nta.nic.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येतील.

<><><><><>

सर्वोच्च न्यायालयानं वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी घेण्यात येणाऱ्या राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा - नीट यूजी २०२५ च्या अंतिम निकालांमध्ये हस्तक्षेप करण्यास नकार दिला आहे. एका प्रश्नासाठी अनेक योग्य उत्तरे असू शकतात, राष्ट्रीय पातळीवरच्या परीक्षेच्या अंतिम उत्तरांत या टप्प्यावर हस्तक्षेप करता येणार नाही असं न्यायाधीश पी. एस. नरसिंहा आणि आर. महादेवन यांच्या पीठानं म्हटलं आहे.

<><><><><>

केंद्र सरकार २०२६च्या हज यात्रेसाठीची अर्ज प्रक्रिया येत्या आठवडाभराच्या आत सुरू करणार असल्याची माहिती केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी दिली आहे. नवी दिल्लीत हज यात्रेचा आढावा घेतल्यानंतर ते बोलत होते. सर्व अर्जदारांना वेळेत अर्ज भरावेत, असं आवाहन त्यांनी केलं. आगामी हज यात्रेसाठी ६५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या यात्रेकरूंसोबत त्यांची एक काळजीवाहक व्यक्ती असणं बंधनकारक असल्याचंही त्यांनी सांगितलं. पुरुष आणि महिलांसाठी निवासाची स्वतंत्र सोय करण्याची विनंती सरकारच्या विचाराधीन असल्याचंही ते म्हणाले.

<><><><><>

ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्ताननं वापरलेल्या लष्करी साधन-सामुग्रीतली ८१ टक्के चीनी बनावटीची होती, अशी माहिती भारतीय लष्कराचे उपप्रमुख

लेफ्टनंट जनरल राहुल आर सिंह यांनी आज दिली.  नवी दिल्लीत न्यू एज मिलिटरी टेक्नॉलॉजी या विषयावर आयोजित चर्चासत्राच्या उद्घाटनपर भाषणात सिंह बोलत होते.

पहलगाम हल्ल्यानंतर राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारतीय लष्करानं ठोस आणि थेट उत्तर दिलं असल्याचं सिंह यांनी पुन्हा एकदा अधोरेखित सांगितलं. ऑपरेशन सिंदूरसाठी तंत्रज्ञानाच्या मदतीनं तसंच गुप्तचर यंत्रणांद्वारे गोळा केलेल्या माहितीच्या आधारावर लक्ष्य निश्चित केली होती. ऑपरेशनच्या सुरुवातीला २१ ठिकाणांवर हल्ला करण्याचं ठरवलं होतं. परंतु शेवटच्या क्षणी नऊ ठिकाणांवरच लक्ष्य करण्याचं निर्णय घेतल्याचं सिंह यांनी सांगितलं.

<><><><><>

भारतानं कायमच सर्व धर्मियांच्या स्वातंत्र्याचं समर्थन केलं आहे आणि भविष्यातही ते केलं जाईल, असं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितलं. तिबेटीयन धर्मगुरू दलाई लामा यांनी अलिकडेच केलेल्या विधानांसंदर्भात ते उत्तर देत होते. कुठलाही धर्म किंवा पंथ यासंदर्भात भारत कुठलीही भूमिका घेत नाही, किंवा काहीही प्रतिक्रिया देत नसल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

एन सी एच अर्थात राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाईननं गेल्या दोन महिन्यात ग्राहकांना ७ कोटी रुपयांहून अधिक रकमेचा परतावा मिळवून दिला आहे. या परताव्याबाबत विविध क्षेत्रातल्या १५ हजारांहून अधिक ग्राहकांनी तक्रारी केल्या होत्या. त्यात ई कॉमर्स तसंच पर्यटन क्षेत्रातल्या ग्राहकांच्या दाव्यांचा मोठा वाटा आहे.

<><><><><>

अँडरसन-तेंडुलकर करंडकातल्या दुसऱ्या कसोटी सामन्यातल्या पहिल्या डावात जेमी स्मिथ आणि हॅरी ब्रूक यांनी इंग्लंडचा डाव सावरला. दोघांच्या

शतकाच्या जोरावर इंग्लंडचा संघ ५ बाद ३५५ धावांवर खेळतो आहे. इंग्लंडचे ३ फलंदाज एकही धाव न करता तंबूत परतले. मोहम्मद सिराज यानं ३ गडी बाद केलं.

//<><><><><>//